# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

## दि. १३/०९/२०२३ रोजीच्या
## पंचवार्षिक कालावधीतील नवीन अधिसभा सदस्यांच्या प्रथम बैठकिचा (सन २०२३ मधील दुसरी बैठक)
# कार्यवाही अहवाल

**अधिसभा बैठक**

**दि. १३/०९/२०२३**

MUHS

2024/FT/025/1735 . R-05/01/2024

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

## दि. १३/०९/२०२३ रोजीच्या
## अधिसभा बैठकीचा कार्यवाही अहवाल

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८ कलम २३ (२) नुसार गठीत केलेल्या अधिसभेची सन २०२३ मधील पंचवार्षिक कालावधीतील नवनियुक्त अधिसभा सदस्यांच्या प्रथम बैठकीचे आयोजन (सन २०२३ मधील दुसरी) दिनांक १३/०९/२०२३ रोजी विद्यापीठ अधिसभागृहात करण्यात आले होते. नियोजित वेळी दुपारी ठिक ११.३० वाजता सभेस सुरुवात करण्यात आली. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| ०१ | मा. ना. श्री. हसन मुश्रीफ, मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये, मुंबई (ऑनलाईन उपस्थित) | अध्यक्ष |
| ०२ | लेफ्टनंट जनरल माधुरी कानिटकर(निवृत्त), मा. कुलगुरु | सदस्य /अध्यक्ष |
| ०३ | प्रा. डॉ. मिलिंद निकुंभ, मा. प्रति कुलगुरु | सदस्य |
| ०४ | डॉ. मिर्झा वजाहत अथर, मा. आमदार | सदस्य |
| ०५ | डॉ. विठ्ठल धडके | सदस्य |
| ०६ | डॉ. विभा हेगडे | सदस्य |
| ०७ | डॉ. मिलींद आवारे | सदस्य |
| ०८ | डॉ. राजकुमार पाटील | सदस्य |
| ०९ | डॉ. वाय. प्रविणकुमार | सदस्य |
| १० | डॉ. पराग संचेती | सदस्य |
| ११ | डॉ. अभय कुलकर्णी | सदस्य |
| १२ | डॉ. चेतना गोरीवाले | सदस्य |
| १३ | डॉ. मिनल मोहगावकर | सदस्य |
| १४ | डॉ. हेमलता जळगावकर | सदस्य |
| १५ | डॉ. गिरीष ठाकुर | सदस्य |
| १६ | डॉ. गजानन एकबोटे (ऑनलाईन उपस्थित) | सदस्य |
| १७ | डॉ. शिशिर पांडे | सदस्य |
| १८ | डॉ. मिलींद देशपांडे | सदस्य |
| १९ | डॉ. यशवंत पाटील | सदस्य |

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक * कुलगुरू कार्यालय * 7/2



VCO IN - 025/1735 Dt. 06/02/2024
VCO OUT - — — Dt 07/02/2024

| | | |
|---|---|---|
| २० | डॉ. बाबासो माळी | सदस्य |
| २१ | डॉ. आशुतोष गुप्ता (ऑनलाईन उपस्थित) | सदस्य |
| २२ | डॉ. संजीव चौधरी | सदस्य |
| २३ | डॉ. सतिष शिंदाडकर | सदस्य |
| २४ | डॉ. विनोद चौधरी | सदस्य |
| २५ | डॉ. विष्णु बावणे | सदस्य |
| २६ | डॉ. संतोष गटने | सदस्य |
| २७ | डॉ. सचिन उमरेकर | सदस्य |
| २८ | डॉ. विजय भोकरे | सदस्य |
| २९ | डॉ. प्रसाद बनसोड | सदस्य |
| ३० | डॉ. आनंद टेंभुर्णीकर | सदस्य |
| ३१ | डॉ. मनिषा सोळंकी | सदस्य |
| ३२ | डॉ. महेंद्र गोशाल | सदस्य |
| ३३ | डॉ. भास्कर खैरे | सदस्य |
| ३४ | डॉ. राजेश शहा | सदस्य |
| ३५ | डॉ. राजीव मुंदाने | सदस्य |
| ३६ | डॉ. जयमाला शिर्के | सदस्य |
| ३७ | डॉ. लक्ष्मण गायकवाड | सदस्य |
| ३८ | डॉ. बाळासाहेब पवार | सदस्य |
| ३९ | डॉ. प्रदिप भाबड | सदस्य |
| ४० | डॉ. तुकाराम उबरहंडे | सदस्य |
| ४१ | डॉ. अभय दातारकर | सदस्य |
| ४२ | डॉ. रविंद्र देवकर | सदस्य |
| ४३ | डॉ. प्रशांत जाधव | सदस्य |
| ४४ | डॉ. प्रज्ञा कापसे | सदस्य |
| ४५ | डॉ. भालचंद्र ठाकरे | सदस्य |
| ४६ | डॉ. विश्रांती गिरी | सदस्य |
| ४७ | डॉ. शामसुंदर भाकरे | सदस्य |
| ४८ | डॉ. ज्योती दुबे-ठाकुर | सदस्य |
| ४९ | श्री. सफल बुब | सदस्य |
| ५० | श्री. यशराज देशमुख | सदस्य |
| ५१ | श्री. स्वराज सानप | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ५२ | श्रीमती ज्योती इटनकर | सदस्य |
| ५३ | श्री. बापुसाहेब झिने | सदस्य |
| ५४ | डॉ. राजेंद्र शि. बंगाळ, कुलसचिव | सचिव |

सदर सभेस उपस्थित राहता येणार नाही, असे खालील सदस्यांनी दुरध्वनीद्वारे/ ई-मेलद्वारे कळविले. सदर अनुपस्थितीस सभागृहाने मान्यता दिली.

| | | |
|---|---|---|
| ०१ | मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | सदस्य |
| ०२ | मा. संचालक, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभाग | सदस्य |
| ०३ | मा. संचालक, संचालनालय, आयुष विभाग | सदस्य |
| ०४ | मा. संचालक, आरोग्य सेवा | सदस्य |
| ०५ | डॉ. पल्लवी सापळे | सदस्य |
| ०६ | डॉ. निलम अंद्रादे | सदस्य |
| ०७ | डॉ. संजीव ठाकुर | सदस्य |
| ०८ | डॉ. फारुक मोतीवाला | सदस्य |
| ०९ | डॉ. मिनाक्षी गजभिये | सदस्य |
| १० | डॉ. सुभाष राऊत | सदस्य |
| ११ | डॉ. अरुण दोडामणी | सदस्य |
| १२ | डॉ. समीर पाटील | सदस्य |
| १३ | डॉ. दत्तात्रय पाटील | सदस्य |

सर्वप्रथम कुलसचिव यांनी सर्व उपस्थित सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले. मआविवि अधिनियम १९९८ कलम २३(४) नुसार, मा.कुलपतींच्या अनुपस्थितीत मा. प्रतिकुलपती अधिसभेचे अध्यक्ष असतात. सदर सभेस उपस्थित राहून सभेचे अध्यक्षस्थान भूषविणेबाबत मा. प्रतिकुलपती यांना विनंती करण्यात आली होती. मा. कुलसचिव यांच्या विनंतीनुसार मा. प्रतिकुलपती यांनी बैठकीचे अध्यक्षस्थान स्वीकारले. तद्नंतर, मा. कुलसचिव यांनी मा. कुलगुरु यांना विद्यापीठाचा अहवाल सादर करण्याची विनंती केली. मा. कुलगुरु यांनी बैठकीसमोर विद्यापीठाचा अहवाल सादर केला. नंतर मा. कुलसचिवांनी मा. प्रति-कुलपती यांना आपले मनोगत व्यक्त करण्यात विनंती केली. मा. प्रतिकुलपती यांनी सभेस आपले मनोगत व्यक्त केले.

तद्नंतर दरम्यान मा. प्रति-कुलपती यांना त्यांच्या कार्यबाहुल्यामुळे अधिसभेच्या बैठकीतुन जावे लागले. त्यामुळे मा. कुलसचिव यांच्या विनंतीनुसार मा. कुलगुरु यांनी बैठकीचे अध्यक्षस्थान स्वीकारले. तद्नंतर, मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेच्या कामकाजास सुरवात करण्यात आली.

**विषय क्र. ०१/२०२३ : दि. १४/०३/२०२३ रोजी झालेल्या अधिसभेच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयांवर विद्यापीठ कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल माहितीस्तव सादर.**

(प्रशासन विभाग)

(टीप : दि.१४/०३/२०२३ रोजी झालेल्या अधिसभेच्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयांवर विद्यापीठ कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. कुलगुरु यांच्या आदेशावरुन अधिसभेच्या माहितीस्तव सादर.)

(कार्यवाही अहवाल स्वतंत्रपणे जोडण्यात आला आहे.)

**ठराव क्र. ०१/२०२३**

दि.१४/०३/२०२३ रोजी झालेल्या अधिसभेच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले व सदर अधिसभेतील ठरावांच्या अनुषंगाने विद्यापीठ कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची सभागृहाने नोंद घेतली.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक * कुलगुरू कार्यालय *

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**कार्यवाही** : सदर ठरावाची नोंद घेण्यात आली.

**विषय क्र. ०२/२०२३ : प्रश्नोत्तराबाबत.**

**(विद्यापीठ परिनियम क्र.०१/२०१० नुसार प्रश्नोत्तरांची पुस्तिका सभेच्या वेळी देण्यात येईल.)**

(प्रशासन विभाग)

१) डॉ. राजेश्वर तुकाराम उबरहंडे, अधिसभा सदस्य यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे अधिसभेसमोर सादर करण्यात आली.

**प्रश्न क्र.०१ : मआविवि अंतर्गत दरवर्षी संलग्नित महाविद्यालयांची स्थानिक चौकशी समितीद्वारे चौकशी करण्यात येते. सदर चौकशी समिती सदस्यांची निवड करत असताना काही विशिष्ट सदस्य व महाविद्यालयांच्या प्रतिनिधींना वारंवार संधी दिले जाते असे लक्षात येत आहे. विद्यापीठाशी संलग्नित अनेक अशी महाविद्यालये आहेत की त्यांच्या**

स्थापनेपासून आजपर्यंत गत दहा वर्षाच्या कालावधीमध्ये एकही प्रतिनिधींना चौकशी समितीत प्रतिनिधीत्व मिळालेले नाही. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये सुध्दा अनेक महाविद्यालयांना जाणीवपुर्वक वंचित ठेवण्यात आले आहे. तद्वतच काही विशिष्ट महाविद्यालयांच्या १० ते १२ प्रतिनिधींना एका वर्षात प्रतिनिधीत्व देण्यात आलेले आहे. याबाबतची भुमिका व हितसंबंध माननिय महोदयांनी स्पष्ट करावे.

उत्तर : शै. व. २०२३-२४ साठी मा. कुलगुरु यांच्या आदेशानुसार स्थानिक चौकशी समितीच्या सदस्यांच्या नियुक्तीसाठी C-DAC या कंपनीमार्फत संगणकीय कार्यप्रणाली तयार करण्यात आली आहे. त्यानुसार वैद्यकीय, दंत, आयुर्वेद, युनानी, समचिकित्सा व तत्सम आरोग्य विज्ञाने या विद्याशाखकरीता स्थानिक चौकशी समिती सदस्यांची नेमणूक करण्याकरीता या संगणकीय कार्यप्रणालीचा वापर करण्यात येत आहे.

सर्वप्रथम सदर कार्यप्रणालीमार्फत सर्व विद्याशाखेच्या पात्र शिक्षकांना स्थानिक चौकशी समितीमध्ये नियुक्ती करण्याबाबत त्यांचा होकार अथवा नकार विद्यापीठास कळविण्याबाबत या सॉफ्टवेअरद्वारे संदेश पाठविण्यात आले होते. ज्या शिक्षकांनी स्थानिक चौकशी समितीमध्ये नियुक्ती करण्याबाबत त्यांचा होकार कळविलेला आहे त्यानुसार, Random Processing करुन संगणकामार्फतच अध्यापकांची नियुक्ती करण्यात येते. त्यामुळे यामध्ये व्यक्तीसापेक्षता राहीलेली नाही.

तसेच, वैद्यकीय, दंत, आयुर्वेद, युनानी व समचिकित्सा या विद्याशाखेंचे स्थानिक चौकशी समितीचे कामकाज पुर्ण झालेले आहे. त्यानुसार यामध्ये विद्यापीठास प्राप्त माहितीनुसार अनेक मान्यताप्राप्त अध्यापकांना प्रथमच स्थानिक चौकशी समितीमध्ये नियुक्त्या प्राप्त झालेल्या आहेत. यामध्ये विविध महाविद्यालयातील अध्यापकांना स्थानिक चौकशी समितीमध्ये प्रतिनिधित्व मिळालेले आहे.

प्रश्न क्र.०२ : सर्व परीक्षा केंद्रावर Digital evaluation Centre ची स्थापन करणेबाबत (Onscreen Evaluation of answer Book) दि.१९/०१/२०२३ पत्र क्र. मआविवि/एक्सपी-३८७/२०२३, दि.१९/०१/२०२३ नुसार डीईसी स्थापना करणेबाबत महाविद्यालयांना कळविण्यात आलेले आहे. सदर डीईसीच्या आवश्यक घटकांमध्ये,

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक * कुलगुरु कार्यालय *

**(a)** Computer (20) with latest licensed operating system software (OSS) with antivirus and firewalls to provide all lock, work station with computer charts and keyboard tray

**(b)** Wiring and networking (with raw power supply and UPS) and one printer per DEC

**(c)** Air Conditioners, Biometric Systems, CCTV installation, restrooms and 24x7 security

**(d)** Collapsible gate for the main entrance with Name board and locking facility.

**(e)** Dual internet service, Primary with 1:1 dedicated line of 100 mbps speed by class 'A' ISP, and alternate line with 1,1 dedicated line of 50 mbps speed, by an another class 'A' ISP to ensure uninterrupted downloading facility with 2 (two) static IP's. चा उल्लेख आढळून येतो.

मा. महोदयांना या सभागृहाद्वारे मी प्रश्न विचारु इच्छितो की सदर डीईसी केंद्र स्थापनेसाठी विद्यापीठ संबंधीत महाविद्यालयांना सदर बाबींचा पुरवठा करणार आहे का ? अथवा आर्थिक मदत करणार आहे का ? याबाबत खुलासा करण्यात यावा.

उत्तर : DEC केद्र स्थापनेसाठी विद्यापीठ संबधित महाविद्यालयांना उक्त नमूद केलेल्या प्रश्नातील बाबींचा पुरवठा केला जात नाही. तसेच विद्यापीठादवारे महाविद्यालयांना DEC केंद्र स्थापनेसाठी कोणतीही आर्थिक मदत देण्यात येत नाही.

तसेच, महाविद्यालयांचे संलग्निकरणाचे नुतनीकरणासाठी वरील बाबींची महाविद्यालयाने पुर्तता करणे विद्यापीठ व संबंधित केंद्रिय परिषदेच्या विद्यमान मानकांच्या निकषांनुसार आवश्यक असून त्याबाबतची खातरजमा विद्यापीठाच्या स्थानिक चौकशी समितीमार्फत करण्यात येत असते.

विद्यापीठ अध्यादेश क्रं.०१/२०१४, कलम (२५) अन्वये केंद्रीय मुल्यमापनासाठी उपरोक्त सुविधा महाविद्यालयांमध्ये असणे अनिवार्य आहे. त्यामुळे पारंपारीक पध्दतीने करण्यात येणाऱ्या मुल्यांकनासाठी सुध्दा उक्त सुविधांची आवश्यकता आहे. त्यामुळे महाविद्यालयांना DEC केंद्र स्थापनेसाठी इतर अतिरीक्त आर्थिक भार पडणार नाही.

२) यशराज अरुणराव देशमुख, विद्यार्थी प्रतिनिधी, अधिसभा सदस्य यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे अधिसभेसमोर सादर करण्यात आली.

**प्रश्न क्र.०१ :** It has come to observation that University aligned colleges are asking much more fees for Hostels regardless to the unavailable facilities so why can't the University bring all the Hostels present in the University aligned colleges under a fees regulatory authority?

**उत्तर :** FRA (Fee Regulation Authority) is an authority established by State Government under Act. This authority decides regarding course fee of all the colleges affiliated to various Universities.

This subject should be referred to FRA by the University for further necessary action.

**प्रश्न क्र.०२ :** To start the revaluation system again for students so that they should get a fair chance and the result of recounting should be declared within some decided time limit.

**उत्तर :** उन्हाळी-२०२३ च्या परीक्षेपासून पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्याकरीता विद्यापीठाने द्विमुल्यांकन पध्दतीचा अवलंब केला आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांच्या प्रत्येक उत्तरपत्रिकांच Evaluation आणि Re-evaluation करुन दोन परीक्षकांपैकी ज्या परीक्षकांनी जास्त गुण दिलेले असतील (Best of Two) ते गुण ग्राहय धरुन विद्यार्थ्यांचे निकाल घोषित करण्यात येतात व या पध्दतीमध्ये सर्व विद्यार्थ्यांना Re-evaluation चा देखिल लाभ मिळतो. पुर्वीच्या परीक्षा पध्दतीमध्ये बऱ्याच अडचणी येत असल्यामूळे त्याचा आढावा घेवून द्विमुल्यांकन परीक्षा पध्दतीचा अवलंब विद्यापीठाने घेतला आहे. शिवाय, पुर्वीची फेरतपासणी प्रक्रिया अत्यंत वेळखाऊ होती व Re-evaluation करीता अर्ज केलेल्या विद्यार्थ्याना त्यांनी कोणत्या परीक्षेसाठी तयारी करावी याचा नेहमी संभ्रम असायचा. तसेच Re-evaluation चा निकाल विद्यापीठाच्या पुढील परीक्षेच्या ऐनवेळी जाहिर होत होते. त्यामुळे विद्यापीठास उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे पुढील परीक्षेकरीता पात्र असलेल्या विद्यार्थ्याचे आवेदन पत्रे (Examination

Forms) ऐन परीक्षेच्यावेळी स्विकारुन त्यांची परीक्षेकरीता बैठक व्यवस्था करवी लागत होती. त्यामुळे परीक्षा केंद्रावर देखील ऐनवेळी विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था करण्याकरीता प्रश्न निर्माण होत होते. तसेच, Re-evaluation मध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक सत्राबाबत महाविद्यालयस्तरावर अनेक अडचणी येत होत्या. तसेच, सर्व उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन व पुनर्मुल्यांकन हे मुल्यांकन केद्रावरच केले जात असल्यामुळे विद्यार्थ्यांची पुनर्मुल्यांकनासाठी लागणाऱ्या शुल्काची देखील बचत होते व शैक्षणिक नुकसान टळते.

तसेच, काही विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने अवलंबलेल्या मुल्यांकन व पुनर्मुल्यांकन पध्दतीबाबत मा. उच्च न्यायालयात याचिका क्र.६१५८/२०१३ दाखल केली होती. मा. उच्च न्यायालयाने सुध्दा त्यांचा आदेशात विद्यापीठाने अवलंबविलेली मुल्यांकन व पुनर्मुल्यांकन पध्दत योग्य असल्याचे नमुद केले आहे.

वरील बाबी व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता विद्यापीठाने अवलंब केलेली द्विमुल्यांकन पध्दती योग्य आहे.

## ठराव क्र.०२/२०२३

डॉ. राजेश्वर तुकाराम उबरहंडे, अधिसभा सदस्य यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मा. व्यवस्थापन परिषद बैठकीतील पारीत ठराव क्र.०१/२०२३ (१११/२०२३) नुसार डॉ. राजकुमार एस पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य तथा अधिसभा सदस्य यांनी सभेसमोर सादर केले.

डॉ. यशराज अरुणराव देशमुख, विद्यार्थी प्रतिनिधी, अधिसभा सदस्य यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे मा. व्यवस्थापन परिषद बैठकीतील पारीत ठराव क्र. ०१/२०२३ (१११/२०२३) नुसार डॉ. मिलींद बा. आवारे, व्यवस्थापन परिषद सदस्य तथा अधिसभा सदस्य यांनी सभेसमोर सादर केले.

**कार्यवाही :** सन्माननीय अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नोत्तराची अधिसभेसमोर वाचन करण्यात आले व सादर करण्यात आलेल्या प्रश्नोत्तराची अधिसभा सदस्यांनी नोंद घेतली.

**विषय क्र. ०३/२०२३ :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८, कलम २६(१)(सात) नुसार मा. व्यवस्थापन परिषदेवर अधिसभा सदस्यांनी विद्याशाखेचा एक अधिष्ठाता यांचे नामनिर्देशन करणेबाबत.

(प्रशासन विभाग (निवडणूक))

(टिप : उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करण्यात येते की, मआविवि, अधिनियम १९९८ मधील कलम २२ अन्वये सन २०१८ मध्ये गठीत विविध प्राधिकरणांची मुदत सन २०२३ मध्ये संपुष्टात आलेली आहे. त्याअनुषंगाने विद्यापीठ प्राधिकरणांची निवडणूक दि. १७/०३/२०२३ व दि. ०५/०४/२०२३ रोजी तसेच मतमोजणी दि. १८/०३/२०२३ व दि. ०६/०४/२०२३ रोजी संपन्न झाली.

मआविवि अधिनियम १९९८, कलम २६(१) नुसार व्यवस्थापन परिषद समितीचे गठण करण्यात येत असते. तसेच कलम २६(१)(सात) नुसार अधिसभेकडून विद्याशाखेचा एक अधिष्ठाता यांचे व्यवस्थापन परिषदेवर नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८, कलम १७ (२) नुसार विद्याशाखानिहाय "अधिष्ठाता" यांची यादी खालीलप्रमाणे.

१) डॉ. विठ्ठल नारायण धडके – वैद्यकीय विद्याशाखा
२) डॉ. विभा राहूल हेगडे – दंत विद्याशाखा
३) डॉ. मिलिंद बाबाराव आवारे – आयुर्वेद व युनानी विद्याशाखा
४) डॉ. राजकुमार एस. पाटील – होमिओपॅथी विद्याशाखा
५) डॉ. वाय. प्रविणकुमार – तत्सम विद्याशाखा

व्यवस्थापन परिषदेवर नामनिर्देशन करणेकरीता मआविवि अधिनियम १९९८, कलम २६(१)(सात) व विद्यापीठाच्या प्राधिकरणाच्या सदस्यांची पात्रता व निकष याबाबत दि.२९/१२/२०११ रोजीचे आदेश राजपत्रामधिल तरतुद खालील प्रमाणे आहे:

| Provision as per MUHS Act,1998 | Education Qualification as per Medical Education & Drugs Department, Got. gazette dtd-29/12/2011 |
|---|---|
| One Dean of faculty nominated by the Senate | 1. Nominated from amongst the Deans of the faculties of the University.<br>2. Having not less than 10 years of teaching Experience.<br>3. Shall possess Post Graduate degree in Health Sciences.<br>4. Published minimum 3 Research Papers in peer reviewed or refereed National or International research Journals. |

करीता, कलम २६(१)(सात) नुसार व्यवस्थापन परिषदेवर अधिसभेने एका विद्याशाखेचा अधिष्ठाता यांचे नामनिर्देशन करण्याकरिता सदर विषय मा. कुलगुरु यांच्या आदेशान्वये विद्यापरिषदेच्या बैठकीत विचारार्थ व नामनिर्देशनास्तव सादर.

(सहपत्र नाही)

**ठराव क्र.०३/२०२३**

व्यवस्थापन परिषदेवर नामनिर्देशन करणेकरीता मआविवि अधिनियम १९९८, कलम २६(१)(सात) व विद्यापीठाच्या प्राधिकरणाच्या सदस्यांची पात्रता व निकष याबाबत दि.२९/१२/२०११ रोजीचे आदेश राजपत्रामधील तरतुद विचारात घेऊन सर्वानुमते डॉ. विठ्ठल नारायण धडके, अधिष्ठाता, वैद्यकीय विद्याशाखा यांचे नामनिर्देशन करण्यात यावे.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**कार्यवाही :** डॉ. विठ्ठल नारायण धडके -अधिष्ठाता वैद्यकीय विद्याशाखा यांचे मआविवि अधिनियम १९९८, कलम २६(१)(सात) नुसार व्यवस्थापन परिषदेवर नामनिर्देशनाबाबत विद्यापीठ पत्र क्र. मआविवि/निवडणूक/अे-३१६/२०२३, दि.२८/०९/२०२३ ची अधिसुचना क्र.५१/२०२३ निर्गमित करण्यात आलेली आहे.

**विषय क्र. ०४/२०२३ : महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८, कलम ४७(२)(अ) नुसार स्थायी समितीवर अधिसभेने, तिच्या सदस्यांमधून तीन सदस्यांचे नामर्निदेशन करणेबाबत.**

(प्रशासन विभाग (निवडणूक))

(**टिप** : उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करण्यात येते की, मआविवि, अधिनियम १९९८ मधील कलम २२ अन्वये सन २०१८ मध्ये गठीत विविध प्राधिकरणांची मुदत सन २०२३ मध्ये संपुष्टात आलेली आहे. त्याअनुषंगाने विद्यापीठ प्राधिकरणांची निवडणूक दि. १७/०३/२०२३ व दि. ०५/०४/२०२३ रोजी तसेच मतमोजणी दि. १८/०३/२०२३ व दि. ०६/०४/२०२३ रोजी संपन्न झाली.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८, कलम ४७(२)(अ) नुसार, स्थायी समितीचे गठण करण्यात येत असते. त्यानुसार अधिसभा सदस्यांमधुन तीन सदस्यांचे स्थायी समितीवर नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक * कुलगुरु कार्यालय *

सदर तीन सदस्यांचे नामनिर्देशन करणेकरीता मआविवि अधिनियम १९९८, कलम ४७(२)(अ) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे :

"अधिसभेने, तिच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेले तीन सदस्य"

करीता कलम ४७(२)(अ) नुसार स्थायी समितीवर अधिसभा सदस्याने अधिसभा सदस्यांमधून तीन सदस्यांचे नामनिर्देशन करण्याकरिता सदर विषय मा. कुलगुरु यांच्या आदेशान्वये अधिसभेच्या बैठकीत विचारार्थ तथा नामनिर्देशनास्तव सादर)

(सहपत्र नाही)

## ठराव क्र.०४/२०२३

विद्यापीठ अधिनियम कलम ४७(२)(अ) नुसार स्थायी समितीवर अधिसभा सदस्याने अधिसभा सदस्यांमधून तीन सदस्यांचे नामनिर्देशन करण्याकरिता सदस्यांमधून डॉ. भोकरे विजय व्ही., डॉ. डेरे राजेश सी., डॉ.गटने संतोष आर., डॉ. गुप्ता आशुतोष, डॉ. जाधव प्रशांत डी., डॉ. माळी बाबासो वाय., डॉ. पाटील यशवंत आर., डॉ. पवार बाळासाहेब एस., डॉ. टेंभुर्णीकर आनंद ए. या ९ सदस्यांनी नामनिर्देशनासाठी आवेदन सादर केले. यामुळे मतपत्रिकेद्वारे Preferencial Voting System द्वारे निवडणूक प्रक्रिया राबवून वरील सदस्यांमधून डॉ. पवार बाळासाहेब एस., डॉ. पाटील यशवंत आर. व डॉ. गटने संतोष आर. यांना अनुक्रमे १६, १२ व १२ इतकी मते प्राप्त झाल्याने त्यांना विजयी घोषित करण्यात येवून त्यांचे कलम ४७(२)(अ) नुसार स्थायी समितीवर नामनिर्देशन करण्यात यावे. उक्त ९ सदस्यांना प्राप्त मतांचा तपशील खालीलप्रमाणेः-

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | एकुण मते |
|---|---|---|
| ०१) | डॉ. भोकरे विजय व्ही. | ०३ |
| ०२) | डॉ. डेरे राजेश सी. | ०७ |
| ०३) | डॉ. गटने संतोष आर. | १२ |
| ०४) | डॉ. गुप्ता आशुतोष | ०२ |
| ०५) | डॉ. जाधव प्रशांत | ०१ |
| ०६) | डॉ. माळी बाबासो वाय. | ०५ |
| ०७) | डॉ. पाटील यशवंत आर. | १२ |
| ०८) | डॉ. पवार बाळासाहेब एस. | १६ |
| ०९) | डॉ. टेंभुर्णीकर आनंद ए. | ०४ |

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक * कुलगुरु कार्यालय *

ठराव सर्वानुमते मंजूर

**कार्यवाही :** डॉ. पवार बाळासाहेब एस.- अधिसभा सदस्य, डॉ. पाटील यशवंत आर.- अधिसभा सदस्य व डॉ.गटने संतोष आर.. - अधिसभा सदस्य यांचे मआविवि अधिनियम १९९८, कलम ४७(२)(अ) नुसार स्थायी समितीवर नामनिर्देशनाबाबत विद्यापीठ पत्र क्र. मआविवि/निवडणूक/अे-३३६/२०२३, दि.२७/१०/२०२३ ची अधिसुचना क्र.७४/२०२३ निर्गमित करण्यात आलेली आहे.

**विषय क्र. ०५/२०२३ : विद्यापीठाचा सन २०२२ चा २४ वा वार्षिक अहवालाच्या अंतिम मसुदास मान्यता मिळणेसाठीचा विषय अधिसभेच्या बैठकीत विचारार्थ सादर.**

(प्रशासन विभाग)

(**टिप :** उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करण्यात येते की, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८ कलम ८६ अन्वये, मा. कुलपती व राज्य शासन यांना सादर करणेकरीता व विधानमंडळ सभागृहाच्या पटलावर पावसाळी अधिवेशनात ठेवण्यासाठी विद्यापीठा दि.०१ जानेवारी २०२२ ते दि.३१ डिसेंबर २०२२ या कालावधीचा सन २०२२ चा २४ वा वार्षिक अहवालाचा मसुदा डॉ. अभय दातारकर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीतर्फे तयार करण्यात आलेला आहे.

समितीमार्फत तयार करण्यात आलेला विद्यापीठाच्या वार्षिक अहवालाच्या मसुद्यास दि.२२ जुन २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परीषदेच्या बैठकीतील ठराव क्र.९३/२०२३ अन्वये, मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.शासाउ-१०.१५/प्र.क्र.४८/सा.उ., दि. २० ऑक्टोबर २०१५ अन्वये, विधानमंडळ सभागृहाच्या पटलावर सादर करणेसाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८ कलम ८६ नुसार तयार करण्यात आलेला विद्यापीठाचा सन २०२२ चा २४ वा वार्षिक अहवालाच्या अंतिम मसुद्यास मान्यता मिळणेसाठीचा विषय मा. कुलगुरु यांच्या आदेशान्वये, अधिसभेच्या बैठकीत विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर)

(वार्षिक अहवालाचा मसुदा सभेच्या वेळी सादर करण्यात येईल.)

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक * कुलगुरू कार्यालय *

**ठराव क्र.०५/२०२३**

डॉ. अभय दातारकर यांनी सादर केलेला विद्यापीठाचा २३ वा वार्षिक अहवालामध्ये सांख्यिकी विभागाच्या माहितीचा समावेश करण्यात येऊन तयार केलेल्या वार्षिक अहवालास मंजुरी प्रदान करण्यात यावी.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**कार्यवाही :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम १९९८ कलम ८६ नुसार तयार करण्यात आलेला विद्यापीठाचा सन २०२२ चा २४ वा वार्षिक अहवाल विधीमंडळाच्या पटलावर सादर करणेअनुषंगाने विद्यापीठ पत्र क्र. मआविवि/अे-७८५/२०२३,दि.२३/१२/२०२३ अन्वये मा. उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्यै विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

**विषय क्र. ०६/२०२३ : डॉ. ख्रिस्तोफर डिसोजा यांना डी. लिट्. सन्मान्य पदवी प्रदान करणेबाबत.**

(परीक्षा प्रशासन विभाग)

(टिप : मआविवि अधिनियम १९९८ च्या कलम ७९ मधील तरतुदी अन्वये डी. लिट् ही सन्मान्य पदवी प्रदान करण्याची तरतूद आहे. अली यावर जंग राष्ट्रीय वाक् एवंम श्रवण दिव्यांगजन संस्थान, मुंबई यांचेकडून विद्यापीठास डॉ. ख्रिस्तोफर डिसोजा यांनी संपादन केलेल्या शैक्षणिक व इतर लक्षणीय उपलब्धीबाबतची प्रमाणपत्रे / दस्ताऐवजांसह प्रस्ताव सादर झाला होता. त्याअनुषंगाने डॉ. ख्रिस्तोफर डिसोजा यांना डी. लिट् ही सन्मान्य पदवी प्रदान करण्या करिता वरील तरतुदीअन्वये त्यांचे श्रेष्ठ स्थान, नैपुण्य व सार्वजनिक सेवा याकारणावरुन ती पात्र व योग्य असल्याचे निश्चित करुन कुलपतींची मान्यता मिळण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव मा. कुलपती कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता.

याअनुषंगाने सदर प्रस्तावास मा. कुलपती कार्यालयातर्फे पत्र क्रमांक No.RB/MUHS-2022/CR-168/Edn-1/114, Dated – 23/01/2023 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आल्याचे कळविण्यात आले असुन डॉ. ख्रिस्तोफर डिसोजा यांना डी. लिट् ही सन्मान्य पदवी प्रदान करण्याचा प्रस्ताव अधिनियमामध्ये उपलब्ध तरतुदींनुसार योग्य त्या मंडळांच्या बैठकीसमोर सादर करण्याची शिफारस केली आहे.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक * कुलगुरू कार्यालय *

सदर सन्माननिय पदवीचा विषय मआविवि अधिनियम १९९८ च्या कलम ७९ (१) अन्वये मा. व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीसाठी दि. २२/०६/२०२३ व्यवस्थापन परिषदेच्या च्या बैठकीत सादर करण्यात आला असता, व्यवस्थापन परीषदेने केलेल्या शिफारशी नुसार, मआविवि अधिनियम १९९८ कलम २७(म) अन्वये अधिसभेच्या मान्यते साठी विषय सादर करणे आवश्यक आहे. कारीता सदर विषय मा. कुलगुरु यांच्या आदेशान्वये मा. अधिसभेच्या बैठकीत विचारार्थ सादर)

(सहपत्र –०१)

**ठराव क्र.०६/२०२३**

डॉ. ख्रिस्तोफर डिसोजा यांना डी. लिट् ही सन्मान्य पदवी प्रदान करण्याकरिता त्यांचे श्रेष्ठ स्थान, नैपुण्य व सार्वजनिक सेवा या कारणावरुन सदर प्रस्तावास मा. कुलपती कार्यालयातर्फे पत्र क्र. No.RB/MUHS-2022/CR-168/Edn-1/114, Dated – 23/01/2023 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आल्याचे विचारात घेता, तसेच व्यवस्थापन परीषदेने २२/०६/२०२३ च्या ठराव क्र.९/२०२३ अन्वये केलेल्या शिफारसीच्या अनुषंगाने **"डॉ. ख्रिस्तोफर डिसोजा यांना डी. लिट् ही सन्मान्य पदवी प्रदान करण्यास"** यथोचितरीत्या सर्वानुमते संमती प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**कार्यवाही** : डॉ. ख्रिस्तोफर डिसोजा यांना दि. २३/०२/२०२४ रोजी होणाऱ्या विद्यापीठाच्या २३ व्या दिक्षांत समारंभात डी. लिट ही सन्मान्य पदवी प्रदान करण्यात येणार आहे.

**आयत्या वेळचा ठराव क्र.०७/२०२३**

(विशेष कक्ष)

बिंदूनामावली तपासणी व नविन आरक्षण धोरण या संदर्भात उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने पारीत करण्यात येते की उच्च व तंत्र शिक्षण विभागाने, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम,२०२१, मधिल कलम ३(१) नुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नीत महाविद्यालये/ संस्थांमधील शिक्षकीय पदांच्या संवर्गनिहाय आरक्षण धोरणाच्या अंमलबजावणीबाबत दि.११ एप्रिल २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. त्यानुसार महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, संलग्नित विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये शिक्षकीय पदांना सदर

करीता शिक्षक नियुक्तीच्या आरक्षणाबाबत दि. [illegible]

तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, यांनी निर्गमित केलेल्या धर्तीवर वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने विद्यापीठ संलग्नित खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयांना लागू होतो किंवा कसे याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत विद्यापीठाने पाठपुरावा करावा. तसेच अधिसभा सदस्यांनी देखिल शासनस्तरावर याबाबत पाठपुरावा करावा.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**कार्यवाही :** विद्यापीठाचे पत्र क्र. मआविवि/विक-जनरल/मंत्रालय/४४६/२०२३ दिनांक २९/०९/२०२३ व पत्र क्र. मआविवि/ विक-जनरल/मंत्रालय/४८३/२०२३ दिनांक ०८/११/२०२३ अन्वये संलग्नित महाविद्यालया मध्ये शिक्षक नियुक्तीच्या अनुषंगाने आरक्षण ठेवणेसाठी मार्गदर्शन मिळणेबाबत वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई यांना पत्र पाठविण्यात आले आहे.

## आयत्या वेळचा ठराव क्र.०८/२०२३

(नियोजन विभाग)

नविन महाविद्यालय सुरु करणे / पदव्युत्तर पदवी विषयात अभ्यासक्रम सुरु करणे / विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढ करणेसाठी राज्यातील सर्व शासकीय महाविद्यालयांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक यांचेकडून संलग्नता प्रमाणपत्र मिळविणे व सदर प्रमाणपत्राचे दरवर्षी नुतनीकरण करुन घेणेकरिता आकारण्यात येणाऱ्या शुल्कातून सूट देणेबाबत शासनामार्फत निर्गमित झालेल्या शासन निर्णय क्र. एमईडी-१०२३/प्र. क्र.३२१/शिक्षण-२, दि. १०/०८/२०२३ च्या अनुषंगाने, सखोल चर्चा करण्यात आली. सदर चर्चेस अनुसरुन, अशा निर्णयामुळे विद्यापीठाच्या विकासावर आर्थिक कमतरतेमुळे विपरीत परिणाम होणार असून विद्यापीठाचे आर्थिक नुकसान होणार आहे. तसेच,

विद्यापीठ अधिनियम १९९८, चे कलम ५ (क्युक्यु) नुसार "फी निश्चित करणे आणि विहीत करण्यात येईल त्याप्रमाणे अशा फीची मागणी करणे आणि ती गोळा करणे" याबाबत विद्यापीठाला अधिकार असून विद्यापीठास शासकीय व खाजगी महाविद्यालयांमध्ये भेदभाव करता येत नाही. विद्यापीठ हि स्वायत्त संस्था असून विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांकडून मिळणारे संलग्नता शुल्क हे विद्यापीठाच्या उत्पन्नाचा मुख्य व महत्वाचा स्त्रोत आहे. विद्यापीठास ठराविक कर्मचाऱ्यांचा वेतन अनुदानाव्यतिरिक्त शासनाकडून संचलनाकरिता कुठलिही भरीव आर्थिक मदत / अनुदान प्राप्त होत नाही. विद्यापीठातर्फे उद्यडण्यात येणारे शैक्षणिक विभाग, वैद्यकीय पदवी व पदव्युत्तर संस्था तसेच संशोधन याकरिता मोठया प्रमाणावर आर्थिक बोजा विद्यापीठावर पडणार असून अशा प्रकारच्या निर्णयामुळे आर्थिक स्त्रोतात मोठी कपात होणार आहे. त्यामुळे शासनाने सदर शासननिर्णयावर पुनर्विचार करणेबाबत शासनास विद्यापीठातर्फे विनंती करण्यात यावी.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**कार्यवाही** : सदर ठरावाच्या अनुषंगाने, शासनास विद्यापीठ पत्र क्र. मआविवि/पीबी/२४७४/२०२३, दि.०४/१०/२०२३, अन्वये, विनंती करण्यात आली आहे.

06-2-24

**सचिव**

06 FEB 2024

7 FEB 2024

**अध्यक्ष**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक * कुलगुरू कार्यालय *